दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २३३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१८ नोव्हेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांना कोर्टाने केले फरार घोषित

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांच्यासह अन्य दोन आरोपी रियाज भाटी, विनय सिंग यांना फरार घोषित करण्यात आले आहेत. मुंबईच्या एस्प्लेनेड कोर्टाने परमबीर सिंग यांना फरार म्हणून घोषित करण्याच्या मुंबई पोलिसांच्या अर्जाला परवानगी दिली आहे. गोरेगाव वसूली गुन्ह्याच्या प्रकरणात गुन्हे शाखेने न्यायालयाकडे अर्ज केला होता.

३० दिवसात परमबीर सिंग हे हजर न झाल्यास त्यांची संपती जप्त केली जाणार आहे.



या प्रकरणात परमबीर सिंग, रियाज भाटी आणि विनय सिंग हे तिन्ही फरार घोषित करण्यात आले आहेत.

गोरेगाव खंडणी प्रकरणात मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांना फरार घोषित करण्यासाठी मुंबई गुन्हे शाखेने कोर्टात अर्ज दाखल केला होता. विशेष सरकारी वकील शेखर जगताप यांनी कोर्टात अर्ज दाखल करून सिंग व्यतिरिक्त रियाझ भाटी आणि विनय सिंग उर्फ बबलू या इतर दोन आरोपींना फरार गुन्हेगार घोषित करण्याचे आदेश देण्याची मागणी केली होती.

# तलावाच्या नंतर प्रितम म्हात्रे यांचा मोर्चा शहरातील गार्डनकडे

## गार्डनमधील नित्कृष्ट दर्जाच्या कामाबद्दल अधिकाऱ्यांना धरले धारेवर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्या समोरच असलेले महात्मा गांधी उद्यानातील सुरू असलेल्या कामाची पाहणी करण्यासाठी आज विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नगरसेविका डॉ.सुरेखा मोहोकर, नगरसेविका सौ.सारिका भगत यांनी उद्यानाला भेट दिली. उद्यानात प्रथम गेल्यानंतर प्रितम म्हात्रे यांनी महात्मा गांधींच्या पुतळ्याला अभिवादन करताना पुतळ्या भोवती जमलेले जाळे त्यांच्या निदर्शनास आले असता त्यांना राग अनावर झाला त्यांनी लगेचच संबंधित अधिकाऱ्यांना यासंदर्भात जाब विचारला.

त्यानंतर पुढे सदर उद्यानात टेंडर मधील कामानुसार आवश्यक असलेले काम निकृष्ट दर्जाचे आहे हे त्यांनी अधिकाऱ्यांना निदर्शनास आणून दिले. येथे लावण्यात आलेले मार्बल व्यवस्थित फिटिंग झालेले नाहीत. उद्यानामध्ये सुरक्षारक्षक असतानासुद्धा सर्व परिसरात दारूच्या बाटल्यांचा खच पडलेला निदर्शनास आला याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला आणि याचा अर्थ तेथील सुरक्षा रक्षकांच्या कामांवरती पुन्हा एकदा त्यांनी प्रश्नचिन्ह उभे केले. तसेच त्यानंतर सदर उद्यानात कंत्राटदाराकडून टाकण्यात आलेली माती ही नियमानुसार नव्हती ती कॉंक्रीटच्या वरतीच अर्धा इंची पेक्षा कमी लाल माती फक्त दाखवण्यात पुरती पसरविण्यात आली आहे हे त्यानी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले. अशा प्रकारच्या बऱ्याचशा त्रुटी त्यांच्या निदर्शनास आल्या. त्याबद्दल



त्यांनी अधिकाऱ्यांना सदर कंत्राटदाराला बोलावून घेऊन सर्व काम नियमानुसार करून घेण्याचे निर्देश दिले आणि पुन्हा काही दिवसांनी काम झाल्यानंतर या उद्यानाचा पाहणी दौरा करण्याचे ठरवले.

याच प्रकारे साईनगर येथे २०१९ साला पासून सुरु असलेल्या गार्डन प्लॉटवर चे काम सुद्धा पाहणी करण्यासाठी तेथे गेले असता तेथे गेल्या दोन महिन्यापासून वीजपुरवठा खंडित झालेला होता हे त्यांच्या निदर्शनास आले. वीजपुरवठा नसल्यामुळे झाडांना पाणी घालण्यासाठी पनवेल महानगरपालिकेकडून घेतलेल्या बोरिंग चे पाणी झाडांना टाकता येत नसल्यामुळे बऱ्याचशा ठिकाणची झाडे ही सुकून गेली होती. लाखो रुपये खर्च करून तेथे उभारण्यात आलेले लॉन आणि झाडे संपूर्ण सुकत होते. तसेच त्या उद्यानात लहान मुलांसाठी लावण्यात आलेली खेळणी सुद्धा काही महिन्यांपूर्वी चोरी करण्यात आली आहेत . या चोरी संदर्भात सुद्धा पनवेल महानगर पालिकेने काय पाठपुरावा केला याचा जाब प्रितम म्हात्रे यांनी अधिकाऱ्यांना विचारला. तसेच या ठिकाणी काही महिन्यांपूर्वी नव्याने लावण्यात आलेले नागरिकांसाठी चे इ टॉयलेट बंद अवस्थेत आढळून आले. सदर नागरिकांसाठी लावलेले टॉयलेट कोणाच्या उद्घाटनासाठी ठेवले .../२

## मिडीया बिझनेस स्पॉन्सरशिप मधून १७ हजार पौंड मिळवून देतो असे सांगून

# प्राध्यापकाच्या पत्नीला साडेसात लाखाला गंडा

**दै.रायगड नगरी । उरण**

मिडीया बिझनेस स्पॉन्सरशिप मधून १७ हजार पौंड मिळवून देतो असे सांगून प्राध्यापकाच्या पत्नीला साडेसात लाखाला गंडा घालण्यात आल्याची घटना उलवे येथे घडली. या प्राध्यापकाच्या पत्नीचे नाव अर्चना अलोककुमार सिंह असे आहे. अर्चना सिंग यांना फेसबुकवर कॅली विल्यम नावाची फ्रेंड रिक्वेस्ट आली होती. सदर अकाउंट वरुन अर्चना यांच्याशी चॅट करून अर्चना यांना मिडीयाच्या बिजनेस साठी स्पॉनसरशिप करतो तुम्ही बिजनेस करा असे सांगितले . तेंव्हा त्यांनी त्या बदल्यात १७००० पौंड देण्याचे कबुल केले व अर्चना यांचे बँक अकाउंट डिटेल्स मागितले.

त्यानंतर विल्यम यांचे मोबाईलवर बंकेचे अकाउंट डीटेल्स दिले. त्यानंतर १० ते १५ मिनिटाने अर्चना यांना एका महिलेचा फोन आला व तीने रॉयल बँक ऑफ स्कॉटलंड शाखा मुंबई येथुन बोलत असल्याचे सांगुन कॅली विल्यम यांच्याकडुन १७००० पौंड आले असुन सदर चे पैसे ट्रान्सपर करण्यासाठी रजिस्ट्रेशन चार्जेस म्हणुन आम्हाला ३० हजार ८०० रु भरावे लागतील असे मला सांगितले.त्यांनतर बँक खात्यातून त्यांच्या अकाऊंटला पैसे पाठविण्यात आले त्यानंतर पुन्हा त्याच महिलेने फोन करुन १ लाख २५ हजार रुपये कनवर्ट चार्जेस लागतील तेंव्हा तुमचे पैसे मिळतील असे .../२

## संक्षिप्त...

### डिझेल परताव्याचे १८ कोटी वितरीत करण्यास वित्त विभागाची मान्यता : ना.अस्लम शेख

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील यांत्रिकी मासेमारी नौकांना डिझेल परताव्याचे रु.१८ कोटी वितरीत करण्यास वित्त विभागाने सहमती दर्शवली आहे.महाराष्ट्रात सध्या १६० मच्छीमार सहकारी संस्थांच्या ९६४६ यांत्रिकी नौकांना डिझेल कोटा मंजूर करण्यात आला आहे. राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदर खात्याचे मंत्री अस्लम शेख यांनी लोकमतला दिली. २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये डिझेल तेलावरील मुल्यवर्धीत कर प्रतिपुर्ती या योजनेसाठी रु.६० कोटींची तरतुद करण्यात आली होती. परंतु कोरोनाच्या संकटामुळे राज्याची आर्थिक परिस्थिती कमकुवत झाल्याने यापूर्वी ५०% म्हणजेच ३० कोटी एवढा निधीच मत्स्यव्यवसाय विभागाला वितरीत करण्यात आला होता. लोकमतने देखिल डिझेल परताव्याचा प्रश्न सातत्याने मांडला होता. डिझेल परताव्याचा वाढत चाललेला अनुशेष पाहता उर्वरीत ५०% टक्के निधी वितरीत करण्याची मागणी मंत्री अस्लम शेख यांनी सातत्याने लावून धरली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत उर्वरीत ३० कोटींपैकी १८ कोटी वितरीत करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली आहे.

यामुळे राज्यातील मासेमारी यांत्रिकी नौकाधारकांना दिलासा मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भाजपा सरकारच्या काळात डिझेल परताव्याचा अनुशेष वाढत गेला. हा अनुशेष भरुन काढत चालू वर्षात रु. ४८ कोटींपर्यंत डिझेल परताव्यासाठी निधी मत्स्यव्यवसाय विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे अशी माहिती त्यांनी दिली.

# रिलायन्स विरोधातील प्रकल्पग्रस्त आंदोलकांना जामीन मंजूर

## जिल्हाधिकारी कार्यालयातील आजच्या बैठकीकडे प्रकल्पग्रस्तांचे लक्ष

**दै.रायगड नरी । पनवेल**

नागोठण्याजवळील रिलायन्स कंपनी (पूर्वीची आयपीसीएल) व्यवस्थापनाच्या विरोधात दि. १५ रोजी विविध मागण्यासाठी नागोठणे ते चोळे येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांकडून छेडण्यात आलेल्या गेट बंद आंदोलनावेळी पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना रिलायन्स कंपनीच्या मुख्य प्रवेश द्वाराजवळच असलेल्या कडसुरे गावाच्या बस थांब्याच्या ठिकाणी ताब्यात घेतले होते. या आंदोलकांना मंगळवारी रोहा येथील न्यायालयात हजर केले असता त्यांना २९ नोव्हेंबर पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. मात्र नंतर लगेचच या ४० प्रकल्पग्रस्त आंदोलकांना जामीन मंजूर करण्यात आला.

रिलायन्सच्या (पूर्वीची आयपीसीएल) ५४७ प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या व इतर काही मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या प्रकल्पग्रस्तांवर जमावबंदी आदेशाचे उल्लंघन, कोणत्याही प्रकारे .../२

रिलायन्स कंपनीच्या (पूर्वीची आयपीसीएल) प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी एक बैठकीचे आयोजन आज गुरुवार दि. १८ नोव्हेंबरला अलिबाग येथे जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे. या बैठकीला रिलायन्स व्यवस्थापनातील अधिकारी, रिलायन्स प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनाचे नेतृत्व करणारे वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर व वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे या बैठकीत काय निर्णय होतोय याकडे सर्व प्रकल्पग्रस्तांचे लक्ष लागले आहे.

# पेण खारेपाटातील पाणी प्रश्नी शेकाप आक्रमक

## २३ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र जीवन प्रधिकरण कार्यालयावर शेकापचा घेराव-मोर्चा



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण खारेपाटातील पाणी प्रश्न सोडविण्याकरिता शेकाप आक्रमक झाली असून माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार २३ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयावर शेकापचा घेराव – मोर्चा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी शेकाप कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेला माजी आमदार धैर्यशील पाटील, शेकापचे चिटणीस संजय डंगर, के. डी. म्हात्रे, माजी नगराध्यक्ष गुरुनाथ मांजरेकर, भाऊ येरुणकर यांच्यासह शेकापक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना माजी आमदार धैर्यशील पाटील म्हणाले की पेण खारेपाट विभागातील पाणीप्रश्न सोडविण्याकरिता यापूर्वीच आम्ही पेण ते मुंबई असा शेतकरी व ग्रामस्थांचा लॉंग मार्च काढला होता. शेकापने केलेल्या आंदोलनाची दखल घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पाणीपुरवठा योजनेकरिता २८ कोटींचा निधी मंजूर केला होता. या कामाकरिता लागणारी १००% रक्कम रुपये २८ कोटी ३८ लाख जीवन प्राधिकरणाकडे वर्गही केली. या योजनेअंतर्गत हेटवणे धरणातील पाणी शहापाडा धरणात आणून ते पाणी पाईपलाईन द्वारे गावागावात घरोघरी पोहोचविण्याचे होते. याकरिता हेटवणे धरणातील पाणी आरक्षित करण्यात आले. ज्याशेतकऱ्यांच्या शेतातून सदरची पाईपलाईन जाणार होती त्या सर्वांना पाणी देण्या करिता परवानग्या घेण्याचे काम आम्ही पूर्ण करून दिले होते.

मार्च २०१९ ला यायोजनेचे ६०% काम पूर्ण झालं होते. महाराष्ट्र जिवन प्रधिकरणाने निवडलेला ठेकेदार काम पुर्ण करण्यात अपयशी ठरला. तसेच सध्याचे लोकप्रतिनिधीनीही हा प्रश्न सोडवण्यात अपयशी ठरले आहेत. त्यामुळे हा पाण्याचा प्रश्न आजही सुटला नाही. वेळेवर योजना पूर्ण .../२

# रायगड जिल्ह्यातील पात्र स्थानिकांना खलाशी भरतीमध्ये प्राधान्य द्यावे : ना.दत्तात्रय भरणे



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथील मच्छिमारांच्या समस्यांचे नियमांतर्गत निराकरण करण्यात यावे. स्थानिक मच्छिमारांना त्यांचा पारंपारिक व्यवसाय करताना मिनी पर्सोनिल बोटीला परवानगी मिळण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करावेत, याचबरोबर खलाशी भरतीमध्ये पात्र स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे, असे निर्देश मत्स्यविकास राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

रायगड येथील स्थानिक मच्छिमारांना येणाऱ्या विविध समस्या सोडविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले जावेत यासाठी मंत्रालयात राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी खासदार सुनिल तटकरे, मेरिटाईम बोर्डचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शर्मा, वरिष्ठ अभियंता सुधीर देवरे, मत्स्यविकास विभागाचे सह आयुक्त रा.ज. जाधव, सहायक आयुक्त .../२

# श्रीवर्धनमध्ये थोडासा पाऊस पडला तरी महावितरणची बत्ती होते गुल

## सततच्या वीज पुरवठा खंडित होण्याने नागरिक त्रस्त

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यात थोडासा पाऊस पडला तरीही वीज पुरवठा खंडित होण्याचा प्रकार घडतो. मंगळवारी मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. पाऊस सुरू होताच वीज पुरवठा खंडित झाला. तो दुपारचे बारा वाजले तरी पूर्ववत करण्यात महावितरणच्या कर्मचार्यांना यश आले नव्हते.

दिवाळीच्या दिवशी देखील विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला होता. त्यावेळी देखील जवळजवळ पाच तास वीज पुरवठा खंडित झाला होता. महावितरणकडून दुरुस्तीच्या नावाखाली अनेक वेळा संपूर्ण दिवसभर वीजपुरवठा खंडित ठेवण्यात येतो. महिन्यातून दोन ते तीन वेळा दुरुस्तीची कामे करून सुद्धा वीज पुरवठा खंडित का करण्यात येतो?असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

मंगळवारी रात्री दीडच्या सुमारास जोरदार पाऊस व मोठ्या प्रमाणावर मेघगर्जना होत असल्याने रानवली धरणाजवळील १२ पोल वरती वीज पडल्याने इंसुलेटर तुटले होते. त्यामुळे श्रीवर्धनला येणारा वीज पुरवठा पूर्णपणे बंद पडला होता. अशी माहिती महावितरणचे उपकार्यकारी अभियंता वाकपैंजण यांनी दिली.

सदर बंद पडलेला वीजपुरवठा दुपारी साडेबारा वाजल्यानंतर पूर्ववत करण्यात महावितरणच्या कर्मचार्यांना यश आले. वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे लघुउद्योजक व पर्यटन व्यवसायिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. तरी महावितरणने पाभरे ते श्रीवर्धन या मार्गावरती अंडरग्राउंड वीज वाहिन्यांचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे. अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

# काळी आणीबाणी

काही दिवसांपूर्वीच ग्लासगो येथे भरलेल्या जागतिक हवामान परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित देशांच्या दबावाला बळी न पडता भारतातील कर्बोत्सर्जानाची घट भविष्यात कशी होईल, याची उद्दिष्टे जाहीर केली होती. ही उद्दिष्टे गाठताना स्वच्छ ऊर्जानिर्मिती, वाहनांनी होणाऱ्या प्रदूषणात घट आणि मुख्य म्हणजे कोणत्याही कारणामुळे हवामाना दूषित वायू सोडण्याचे प्रमाण कमी करणे, या आवश्यक गोष्टी आहेत. पंतप्रधान ही परिषद आटोपून राजधानीत परत आले, तेव्हाच दिल्ली महानगर क्षेत्राची अवस्था 'विषारी वायूंनी खचाखच भरलेल्या' गॅस चेंबरसारखी झाली होती. आता तर दक्षिण मुंबई आणि राजधानी दिल्ली या दोन्ही ठिकाणच्या हवेची गुणवत्ता कमालीची घसरल्याचे शास्त्रीय चाचण्यांमधून दिसते आहे. अर्थात, यासाठी अशा चाचण्यांचीही गरज नाही. याचे कारण, प्रदूषित हवेमुळे हजारो मुले आणि त्यांचे पालकही श्वसनाच्या विकाराने आजारी पडत आहेत. त्यांचा खोकला थांबायला तयार नाही आणि प्रदूषित हवा सतत शरीरात गेल्याने फुफ्फुसांचे आरोग्य कायमचे धोक्यात येण्याचीही भीती आहेच. आता दिल्लीपुरता तरी हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात पोहोचला असून, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाच्या सरकारने 'टाळेबंदी लावायचीच असेल, तर ती फक्त दिल्ली महापालिका क्षेत्रापुरती न लावता 'दिल्ली महानगर क्षेत्र' (एनसीआर) तीत समाविष्ट व्हायला हवे,' अशी विनंती केली आहे. ती योग्यच आहे. गेल्या काही वर्षांमध्ये हरियाणा आणि उत्तर प्रदेश या राज्यांमधला फार मोठा भाग दिल्ली महानगरात आला आहे. त्यांचा विचार केल्याशिवाय दिल्लीचा कोणताही प्रश्न सुटू शकत नाही. दरवर्षी दिल्लीत हिवाळ्यात येणारी समस्या म्हणजे, हंगाम संपल्यानंतर आसपासच्या हजारो एकर शेतीवरील राब किंवा पराट्या जाळल्यामुळे होणारे प्रदूषण हीच आहे. गेल्या अनेक वर्षांमध्ये या पराट्या न जाळता त्यांचा काही पर्यायी पर्यावरणपूरक वापर करता येईल का, असे प्रयत्न चालू आहेत. कागदाचे किंवा इतरही अनेक प्रकल्प उभे राहिले आहेत. ते पुरेसे नाहीत, हेच सध्याच्या पेचप्रसंगावरून लक्षात येते आहे. म्हणजे, करोनाने लादलेली टाळेबंदी संपत असली, तरी प्रदूषणामुळे राजधानीत नव्याने संपूर्ण टाळेबंदी लागू करण्याची आफत येऊन ठेपली आहे. राजधानीची ही अवस्था असताना, आर्थिक राजधानीची स्थिती काही वेगळी नाही. दोन दिवसांपूर्वी दक्षिण मुंबई या सर्वांत श्रीमंत आणि उद्यमशील भागातील हवा दिल्लीपेक्षाही अधिक विषारी व धोकादायक होती, असे आढळून आले आहे. माझगाव, वांद्रे-कुर्ला संकुल आणि मालाड अशा भागांमध्येही प्रदूषणाचा स्तर चिंताजनक आहे. खरे तर, मुंबईला अरबी समुद्राचे फार मोठे वरदान आहे. सागरावरून येणारे ताज्या वाऱ्याचे ताकदवान झोत मुंबईतील प्रदूषित हवा बऱ्याच प्रमाणात स्वच्छ करीत असतात; मात्र हेही सध्या पुरेशा प्रमाणात होत नाही. करोनाचे निर्बंध जवळपास संपल्यामुळे महादिल्ली काय किंवा महामुंबई काय, दोन्ही ठिकाणी अर्थचक्राला सुसाट गती आली आहे. ही गती एकीकडे अर्थकारणाला उपकारक ठरत असली, तरी दुसरीकडे हवामानाची गुणवत्ता त्यामुळेही खालावत आहे. लाखो वाहनांमधून होणारे वाढते कर्बोत्सर्जन हेच दिल्ली आणि मुंबईचे वाढते दुखणे आहे. हा प्रश्न केवळ दिल्ली राज्य सरकारपुरता मर्यादित न ठेवता, या प्रकरणी केंद्र सरकारने तातडीने बैठक घ्यावी, असे सर्वोच्च न्यायालयाने सुचविले आहे. दुसरीकडे, शेतातील राब जाळल्यामुळे होणारे राजधानीतील प्रदूषण केवळ दहा टक्के असून, ७५ टक्के प्रदूषण वाहतूक आणि पर्यावरणीय नियम न पाळणारे उद्योगधंदे यांच्यामुळे होते, असे महत्त्वाचे निरीक्षण खंडपीठाने नोंदविले आहे. असे असेल, तर केंद्र व राज्य सरकारांना केवळ शेतकऱ्यांकडे बोट दाखवून या प्रश्नापासून पळ काढता येणार नाही. दिल्लीतील प्रदूषणाचा प्रश्न नवा नाही. तो गेल्या दशकभरात क्रमाक्रमाने अधिक उग्र होत चालला आहे. काही काळापूर्वी दिल्लीत श्वसनाचे विकार होणाऱ्या लहान मुलांची पाहणी करण्यात आली होती. तिच्यातून धक्कादायक आणि चिंताजनक वास्तव पुढे आले होते. आताही शाळा बंद राहणार असल्या, तरी असे किती काळ चालणार? आणि लाखो लहान मुलांना केवळ शाळा बंद ठेवल्याने दिवसरात्र स्वच्छ हवा देण्याची जबाबदारी कशी काय पार पाडली जाणार? हवामान आणि कर्बोत्सर्जन याबाबत जग काय म्हणेल किंवा विकसित देश काय ठपका ठेवतात; यापेक्षा आपल्याच देशातील नागरिकांचे व विशेषकरून नव्या पिढीचे आरोग्य कसे सुखरूप राहील, हा एकमेव निकष लावण्याची गरज आहे. दिल्लीत आज जी ही कार्बनची 'काळी आणीबाणी' अवतरली आहे; तिच्यापासून केवळ महामुंबईच नाही, तर महापुणे व इतर महानगरेही फारशी दूर नाहीत. 'दिल्ली बहोत दूर है' असे म्हणत आपण आज बेसावध राहिलो, तर उद्या शहरी महाराष्ट्रावर हे गंभीर संकट कोसळू शकते.



पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या माणगांव शासकिय विश्रामगृह येथे झालेल्या पत्रकार परिषदेत रायगड जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप हे देखिल आले असता, माणगांव तालुका पत्रकार सेवा संघा तर्फे पत्रकारांच्या वतिने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन मोठ्या उत्साहात हार्दिक स्वागत करण्यात आले. याप्रसंगी तालुक्यातील व जिल्ह्यातील पत्रकार मित्र मोठ्या खेळीमेळीच्या वातावरणात उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## तलावांच्या नंतर प्रितम म्हात्रे यांचा मोर्चा शहरातील गार्डनकडे

आहे का? असा संतप्त सवाल त्यांनी अधिकाऱ्यांना विचारला.

नागरिकांसाठी देण्यात आलेला सुखसुविधा फीटिंग झाल्यानंतर आपण युद्धपातळीवर सुरू करून नागरिकांना लोकार्पण का करत नाही अनेक वर्षे हे उद्यान येथे दिसत आहे. परंतु नागरिकांना त्याचा लाभ मिळत नाही. सदर उद्याना संदर्भात राहिलेल्या त्रुटी आणि आवश्यक ती कामे त्वरित पूर्ण करून सदर उद्यान नागरिकांसाठी खुले करण्याचा निर्धार यावेळी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी व्यक्त केला. याप्रसंगी त्या ठिकाणच्या स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. एकीकडे शहरातील सत्ताधारी पुढारी उद्घघाटना मध्ये व्यस्त आहेत. आणि दुसरीकडे विरोधी पक्ष जुनी उद्घघाटने झालेल्या कामांवर लक्ष ठेवून नागरिकांच्या सोयीसाठी पुढाकार घेत आहे अशा प्रकारची चर्चा नागरिकांमध्ये ऐकायला मिळाली.

## प्राध्यापकाच्या पत्नीला साडेसात लाखाला गंडा

सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी १लाख २५ हजार रुपये मी ऑनलाईन पाठवले. तरी देखिल पैसे अकाउंटवर आले नाही. त्यावेळी कली विल्यम हा मला सदरचे पैसे लवकरात लवकर बँकेत वळवुन घेणेबाबत सांगत होता. त्यानंतर पुन्हा त्या महिलेचा फोन आला व आता तुमचे पैसे बँकेत ट्रॅन्सपर करण्यासाठी टॅक्स चे २लाख ६० हजार रुपये पाठविणे बाबत सांगितले. त्याप्रमाणे २लाख ६० हजार रुपये पाठविले. तरी देखिल पैसे माझ्या अकाउंटवर आले नाही त्या महिलेस पुन्हा फोन केला असता त्यांने जी.एस.टी. चार्जेस म्हणुन ९२ हजार ७०० रुपये लागतील असे सांगितले. हे ९२ हजार ७०० रूपये पाठविल्यानंतर देखिल पैसे आले नाहीत आणि सदरची महिला काहीतरी कारणे सांगुन मला उडवाउडवी करत होती.

त्यानंतर पुन्हा त्या महिलेने फोन करुन सदरचे पैसे मिळण्यासाठी आताअपग्रेड चार्जेस म्हणुन ३ लाख ७ हजार ८५० रुपये द्यावे लागतील असे सांगितले व सदरचे पैसे रुस्तम यांचे अलाहबाद बंक अकाउंट नं.५०४९५५८५७०८ वर पाठविण्यास सांगितले .त्यानंतर अर्चना यांनी २ लाख १०००० रुपये पाठविले परंतू तरी देखिल कली विल्यम यांने पाठविलेले १७ हजार पौंड अर्चना यांच्या खात्यात जमा झाले नाहीत. त्यानंतर अर्चना यांना आपली या प्रकरणात एकूण ७ लाख ४८ हजार ५०० रूपयांची फसवणूक झाली आहे.फसवणुक होत असल्याचे लक्षात आल्याने त्यांनी न्हावाशेवा पोलिस ठाण्यात या बाबत तक्रार दाखल केली असून न्हावाशेवा पोलिस या प्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

## रिलायन्स विरोधातील प्रकल्पग्रस्त आंदोलकांना जामीन मंजूर

सभेची परवानगी न घेता ध्वनीक्षेपकाचा वापर तसेच कोविड-१९ च्या अनुषंगाने सोशल डिस्टसिंगचे नियम न पाळता कोणीही मास्क न लावता कंपनी विरोधात संघटनेचे झेंडे हातात घेवून घोषणाबाजी केल्याप्रकरणी नागोठणे पोलिस ठाण्यात सोमवारी (दि.१५) रात्री उशिरा गुन्हे दाखल करण्यात आले होते. याच प्रकल्पग्रस्त आंदोलकांना रोहा येथील कनिष्ठ स्तर न्यायालयात मंगळवारी (दि.१६) दुपारी हजर करण्यात आले. यामध्ये ४० पुरुष प्रकल्पग्रस्त आंदोलकांचा समावेश होता.

दरम्यान प्रकल्पग्रस्त आंदोलकांनी केलेले आंदोलन हे कोणतीही तोडफोड वा कोणत्याही सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान न करता केले होते. त्यामुळे ज्याप्रमाणे ३० महिला आंदोलकांना ४१ अ ची नोटीस देऊन सोडण्यात आले होते. त्याप्रमाणेच पुरुष आंदोलकांनाही नोटीस देऊन सोडणे गरजेचे असतांना नोटीस दिली नाही. तसेच हा जामीनपात्र गुन्हा असूनही त्यांना रात्रभर डांबून ठेवण्याची गरज नव्हती. त्यांना पोलिसांनी रात्रीच बाँड वर सोडणे गरजेचे होते.

मा. सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार तसेच खास करुन त्या कलमातील तरतुदीनुसार एकतर पोलिसांनी तरी त्यांना जामीन द्यावा किंवा न्यायालयात सकाळीच हजर करुन त्यांना ताबडतोब जामीन देणे गरजेचे होते किंबहुना त्यांनी जामीन द्यायलाच पाहिजे. त्यामुळेच आंदोलकांना रात्रभर डांबून ठेवणे हे बेकायदेशीर कृत्य असून आंदोलकांची छळवणूक करण्याचा हा प्रकार आहे. त्यामुळे याप्रकरणी आम्ही एक वेगळ्या प्रकारची तक्रार दाखल करणार असल्याचे प्रकल्पग्रस्त आंदोलकांची बाजू रोहा येथील कनिष्ठ स्तर न्यायालयात मांडणारे मुंबई उच्च न्यायालयातील वकील ॲड. संदेश मोरे यांनी सांगितले.

## पेण खारेपाटातील पाणी प्रश्नी शेकाप आक्रमक

न झाल्यास शासनाने मंजूर केलेला निधी परत जाईल असे ते म्हणाले. हा मोर्चा शेकापक्षाच्या पुढाकाराने असला तरी या मोर्चामध्ये सर्वपक्षीय नेत्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन यावेळी माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी केले. ठोस उपाययोजना झाल्या शिवाय आपले आंदोलन मागे घेणार नाहीत. खारेपाट विभागातील महिलांच्या डोक्यावरील पाण्याचा हंडा उतरल्याशिवाय शांत बसणार नाही. असा इशारा माजी आमदार धैर्यशील पाटील यांनी यावेळी दिला.

## रायगड जिल्ह्यातील पात्र स्थानिकांना खलाशी भरतीमध्ये प्राधान्य द्यावे

सुरेश भारती यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. राज्यमंत्री भरणे म्हणाले, या मच्छिमारांच्या समस्यांचे नियमांतर्गत तातडीने निराकरण करण्यात यावे. रायगड जिल्ह्यातील आदगाव कोळीवाडा येथे नौका नोंदणीबाबत गैरव्यवहार होऊ नये यासाठी मत्स्य व्यवसाय विभागाने दिलेल्या नियमांचे पालन संबंधित अधिकाऱ्यांनी करावे. येथे असलेल्या ८० ते ९० मासेमारी नौका खडकाळ किनाऱ्यामुळे सुरक्षित नाहीत, त्या सुरक्षित करण्यासाठी हा ५० हजार चौरस मीटरचा खडकाळ भाग मोकळा करण्याच्या कामांना गती द्यावी. आदगाव येथील मासेमारी बंदराचा विकास करण्याचा प्रस्ताव केंद्रात पाठविण्यासंदर्भातील कामास गती देण्यात येईल, मच्छिमारांची बँक असण्यासंदर्भातील प्रस्तावावर सकारात्मक विचार करण्यात येईल. तीन प्रस्तावीत जेट्टींच्या कामास गती द्यावी. ज्या मच्छिमार संस्था बंद आहेत त्यांना मोठ्या सुरू असलेल्या संस्थेत कोटा वर्ग करून डिझेल उपलब्ध करून घ्यावे. स्थानिक बँकातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून किसान क्रेडिट कार्डचे निधी उपलब्ध करून देण्यात यावे, अशा सूचनाही राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिल्या.

यावेळी खासदार सुनिल तटकरे यांनी रायगड जिल्ह्यातील स्थानिक मच्छिमारांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाचे सहकार्य मिळावे असे सांगून या मच्छिमारांच्या संबंधित मत्स्य परवाना, जेट्टी बांधणे, खडींची अडथळे, नोकरीत स्थानिकांना प्राधान्य, घरकुल, किसान क्रेडीट कार्ड अशा विविध विषयांवरील समस्या राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासमोर मांडल्या.

# पोलादपूर शहरामध्ये आज काँग्रेस पक्षाचा जाहिर मेळावा आणि आढावा बैठक

### आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुनर्वसन मंत्री ना.वडेट्टीवार यांची उपस्थिती

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या पोलादपूर तालुका कार्यकारिणीतर्फे आज गुरूवार दि. १८ नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळी ११ वाजता काँग्रेस पक्षाचा जाहिर मेळावा आणि आढावा बैठक आयोजित करण्यात आली असून याप्रसंगी राज्याचे आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुनर्वसन मंत्री ना.विजय वडेट्टीवार उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत,अशी माहिती तालुका काँग्रेस अध्यक्ष अजय सलागरे यांनी येथे दिली.

पोलादपूर शासकीय विश्रामगृहामध्ये सकाळी साडेअकरा वाजता राज्याचे पुनर्वसनमंत्री ना.विजय वडेट्टीवार यांचे आगमन झाल्यानंतर काँग्रेस पक्षाच्या जाहिर मेळावा आणि आढावा बैठकीप्रसंगी ना.वडेट्टीवार यांच्यासमवेत रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत, रायगड जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा श्रध्दा ठाकूर,महाड विधानसभा काँग्रेस नेते हनुमंत मो.जगताप, महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा महाड नगराध्यक्षा स्नेहल जगताप-कामत तसेच महाराष्ट्र विद्यार्थी काँग्रेस सरचिटणीस श्रीयश जगताप या प्रमुख मार्गदर्शकांसोबतच रायगड जिल्हा सरचिटणीस धनंजय देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष अनंत पार्टे, जिल्हा खजिनदार दिलीप भागवत, नेते कृष्णा कदम, शहरअध्यक्ष अमोल भुवड, उपसभापती शैलेश सलागरे, माजी सभापती तथा विद्यमान सदस्या दिपिका दरेकर, जिल्हा महिला काँग्रेस सरचिटणीस शुभांगी चव्हाण, पोलादपूर तालुका महिला काँग्रेस अध्यक्षा सुवर्णा भुवड, युवक तालुका अध्यक्ष प्रवीण महाडीक, शहर अध्यक्ष सचिन दुदुस्कर, विभागीय अध्यक्ष उस्मान करबेलकर, प्रकाश साळवी, भरत चोरगे, अविनाश उतेकर तसेच अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती यावेळी तालुका अध्यक्ष अजय सलागरे यांनी दिली.

पोलादपूर तालुक्यातील अतिवृष्टी व दरडग्रस्त भागा-तील बाधितांच्या पुनर्वसनाच्या पार्श्वभूमीवर आवर्जून पोल-ादपूर तालुक्यातील केवनाळे गावाचा पाहणी दौरा करणाऱ्या पुनर्वसनमंत्री ना.वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत पोलादपूर तालुका काँग्रेस कार्यकारिणीतर्फे जाहिर मेळावा आणि आढावा बैठकीवेळी पोलादपूर नगरपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या आगामी पंचवार्षिक निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये जोश निर्माण करण्याचा प्रयत्न होण्याचे संकेत प्राप्त होत आहेत.

# सीबीडीत २१ लाख ४४ हजार रुपयांची वीज चोरी उघड

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सीबीडीतील दिवाळे गावात रहाणाऱ्या एका महिलेने घर-ातील विद्युत मिटरला वीज पुरवठा करणार्या केबलला दोन ठिकाणी वायरने टॅपिंग करुन आपल्या तळ मजला व वरच्या मजल्यावरील घराला चोरुन वीज घेतल्याचे उघडकिस आले आहे. महावितरणच्या विशेष पथकाने केलेल्या तपासणीत ही वीज चोरी उघडकिस आली आहे. मागील दोन वर्षामध्ये सदर महिलेने तब्बल २१ लाख ४४ हजार रुपये किंमतीची एकुण ८२ हजार ३०७ युनिटची वीज चोरी केल्याचे उघडकिस आली आहे. त्यानुसार एनआरआय पोलिसांनी सदर महिलेविरोधात वीज चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

महावितरणच्या वतीने गत सफ्टेंबर महिन्यापासून वीजेची चोरी करणाऱ्याविरोधात विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे. या विशेष मोहिमेमुळे अनेक वीज चोरीचे प्रकार उघडकिस आले आहेत. वीज चोरीचा शोध घेणार्या विशेष पथकाने वीज मीटर चे बील कमी येणाऱ्या ग्राहकांची यादी करुन त्यांच्या वीज मीटरच्या तपासणीची विशेष मोहिम सुरु केली आहे. या मोहिमेत सीबीडीतील दिवाळे गावात रहणाऱ्या एका महिलेच्या तळ मजला व वरच्या मजल्यावरील घरासाठी असलेल्या दोन वीज मिटरचे बील खुप कमी येत असल्याची माहिती विशेष पथकाला मिळाली होती. त्यामुळे विशेष पथकाने गत २० सप्टेंबर रोजी दिवाळे गावातील सदर महिलेच्या तळ मजला व वरच्या मजल्यावरील घरासाठी असलेल्या दोन्ही वीज मिटरची तपासणी केली होती. त्यासाठी विशेष पथकाने दोन्ही वीज मिटरच्या बाजुला असलेले मुख्य स्वीच बंद करुन तळ आणि वरच्या मजल्यावरील घरातील उपकरणे चालु आहेत का? याची खात्री केली होती. यावेळी तळ आणि वरच्या मजल्यावरील घरातील उपकरणे चालू असल्याचे तसेच दोन्ही जिन्यातील उपकरणांचा विद्युत पुरवठा बंद झाल्याचे आढळुन आले. त्यानंतर महावितरणच्या विशेष पथकाने सदर घरासाठी असलेल्या दोन्ही मिटरची सखोल तपासणी केली असता, फिडर पिलर मधून घरातील विद्युत मिटरला वीज पुरवठा करणाऱ्या इन्कमिंग केबलला दोन ठिकाणी चोरुन लाल व काळ्या वायरने टॅपिंग केल्याचे आढळून आले. तसेच त्याद्वारे सदर महिलेच्या तळ आणि वरच्या मजल्यावरील दोन्ही घरातील पाण्याचे पंप व इतर उपकरणासाठी डायरेक्ट वीज पुरवठा करुन वीज चोरी करण्यात येत असल्याचे आढळून आले. अशा पद्धतीने सदर महिलेने सप्टेंबर २०१९ ते सप्टेंबर २०२१ या कालावधीत तब्बल २१ लाख ४४ हजार रुपये किंमतीची एकुण ८२ हजार ३०७ युनिटची वीज चोरी करुन महावितरणचे नुकसान केल्याचे आढळुन आले. सदरची वीज चोरी उघडकिस आल्यानंतर महावितरणच्या विशेष पथकाने वीज ग्राहक असलेल्या महिलेला १५ नोव्हेंबर पर्यंत वीज चोरीची २१ लाख ४४ हजार रुपयांची रक्कम भरण्यासाठी मुदत दिली होती. मात्र सदर महिलेने वीज चोरीची रक्कम न भरल्याने महावितरणचे सहाय्यक अभियंता रोहित बागुल यांनी एनआरआय पोलीस ठाण्यात त्यांच्या विरोधात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी सदर महिलेविरोधात विद्युत कायदा २००३ कलम १३५ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# उरण तालुक्यातील पाणजे पाणथळीचा श्वास पुन्हा मोकळा

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण तालुक्यातील पाणजे पाणथळ क्षेत्रात भरतीच्या पाण्याला अटकाव करणारे पाच बुजवलेले मार्ग खुले करण्यात आल्याने सध्या पर्यावरणप्रेमी आनंदात आहेत. आता याठिकाणी स्थलांतरीत पक्ष्यांचे आगमनही होऊ लागले आहे. सिडको, महसूल आणि वन विभागाचे अधिकारी, सोबतच नेटकनेक्ट फाउंडेशन आणि श्री एकविरा आई प्रतिष्ठानचे पर्यावरणप्रेमी तसेच मासेमारी समुदायाच्या प्रतिनिधींनी काल ३ तास सुमारे ३०० हेक्टरच्या परिसरात फेरफटका मारून हे पाचही प्रवाह मार्ग स्वत: तपासले.

हा पाणथळ परिसर पक्षी अभयारण्य म्हणून घोषित करण्याची याचिका वनशक्ती फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली होती. त्यावर मुंबई उच्च न्यायालयाने सरकारला नोटीस जारी केल्याने ही भेट महत्त्वपूर्ण ठरली आहे. ओहोटीची वेळ असल्याने प्रव-ाहाचे पाणी समुद्रात परतून जात असल्याचे निदर्शनास आले. ११ नोव्हेंबर २०२० रोजी राज्य पर्यावरण विभागाकडून प्रवाहाचे मार्ग खुले करण्याविषयी आदेश देण्यात आले, मात्र त्या दिशेने कोणतीही हालचाल दिसून आली नाही. श्री एकविरा आई प्रतिष्ठानच्या याचिकेला प्रतिसाद देताना राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरणाच्या पश्चिम क्षेत्र खंडपीठाने रायगड जिल्हाधिकारी व शहर नियोजनकार सिडकोकडे राज्य सरकारच्या आदेशांची खातरजमा करण्यास सांगितले.

अखेर वर्षभर चाललेल्या संघर्षानंतर जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी घातपाताच्या तक्रारींची दखल घेत पाण-थळ क्षेत्रात भरतीच्या पाण्याला अटकाव करणारे मार्ग खुले करण्यात पुढाकार घेत, या भागाचे रुपांतर कॉन्क्रीटच्या जंगलात करण्यासाठी स्वारस्य असलेल्या घटकांचे डाव हाणून पाडले. या ठिकाणी नवी मुंबई एसईझेडकडून बसविण्यात आलेली सुरक्षा रक्षकांची अनधिकृत केबिन्सही हटविण्यात आली. उप-विभागीय अधिकारी राहुल मुंडके यांनी पर्यावरणप्रेमीना हमी दिली की, बुजविण्यात आलेले मार्ग खुले करण्यात येतील व या कामात अधिकाऱ्यांकडून पाणथळ क्षेत्रावर नजर ठेवली जाईल. पक्षी या ठिकाणी परतत असल्याने ते आंनदीतआहेत.

नेटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी सरकार दरबारी पाणथळ क्षेत्राला बायोडायव्हर्सीटी पार्कचा दर्जा मिळण्याच्या दृष्टीने पुढकार घेण्यासंबंधी विनंती केली आहे. या क्षेत्राचे संवर्धन करून एनएमएसईझेड समवेत करण्यात आलेला भाडे व्यवहार रद्द करण्याविषयी सुचविण्यात आले. ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्याच्या सॅटेलाईट सॅनच्युरीचा भाग म्हणून पाणथळ क्षेत्राचे संवर्धन करण्याची इच्छा या अगोदरच राज्य मॅन्ग्रोव्ह फाउंडेशनने व्यक्त केली आहे. हे पाणथळ क्षेत्र अनेक प्रकारच्या माशांचे प्रजोत्पादक केंद्र असून या ठिकाणी भरतीच्या पाण्याचा मार्ग खुला झाल्याने मच्छिमार समुदायात समृद्धी नांदेल, असे विचार श्री एकविरा प्रतिष्ठानचे प्रमुख नंदकुमार पवार यांनी व्यक्त केले.

# कोरोनाचे राज्यात आज हजारावर नव्या रुग्णांचे निदान

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात आज कोरोनाच्या दैनंदिन रुग्णसंख्येत वाढ झाली असून मृत्युसंख्या किंचित कमी झाली आहे. मात्र, बरे होणाऱ्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली असून, राज्यातील एकूण सक्रिय रुग्णांची संख्या आणखी कमी झाल्याने राज्यात दिलासादायक चित्र आहे. राज्याच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज दिवसभरात राज्यात १ हजार ००३ इतक्या नव्या रुग्णांची नोंद झाली आहे. काल ही संख्या ८८६ इतकी होती. तर आज दिवसभरात एकूण १ हजार ०५२ रुग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. काल ही संख्या ९४८ इतकी होती. तर, आज ३२ रुग्णांचा मृत्यू झाला. काल ही संख्या ३४ इतकी होती.

आज राज्यात झालेल्या ३२ रुग्णांच्या मृत्यूंनंतर राज्याच्या मृत्यूदर २.१२ टक्क्यांवरच स्थिर आहे. याबरोबर राज्यात आतापर्यंत एकूण ६४ लाख ७० हजार ७९१ रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९७.६४ टक्के इतके आहे.

आज राज्यातील एकूण सक्रिय रुग्णांची संख्या ११ हजार ७६६ इतकी आहे. काल ही संख्या ११ हजार ८४७ इतकी होती. या बरोबरच राज्यातील दैनंदिन रुग्णवाढीचा विचार करता सर्वात जास्त रुग्णवाढ आज मुंबई महानगरपालिका क्षेत्रात झाली आहे. मुंबईत एकूण २७२ नव्या रुग्णांचे निदान झाले आहे. तर त्या खालोखाल अहमदनगर जिल्ह्यात ६० नवे रुग्ण आढळले आहेत. तर पुणे मनपा क्षेत्रात आज ११० नवे रुग्ण वाढले आहेत. तर पुणे जिल्ह्यात १०७ नवे रुग्ण आढळले.

त्या खालोखाल ठाणे महापालिका क्षेत्रात एकूण ३७, तर ठाणे जिल्ह्यात २६ नव्या रुग्णांची वाढ झाली आहे. तसेच, नवी मुंबई मनपा क्षेत्रात २६, कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रात २४, मीरा भाईंदर मनपा क्षेत्रात २३, पनवेल मनपा क्षेत्रात १७, वसई विरार मनपा क्षेत्रात १० आणि रायगडमध्ये ही संख्या १४ इतकी आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## वृद्ध महिलेचे गंठण खेचून पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण खेचून मोटारसायकलीवरून आलेले दोघे जण पसार झाल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

प्रमिला लोंढे (वय-६५) या नवीन पनवेल बाजूकडून पनवेल बाजूकडील सिग्नल परिसरात मॉर्निंग वॉक करीत असताना मोटारसाकलीवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांच्या गळ्यातील २ तोळे वजनाचे सोन्याचे गंठण खेचून ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आले आहे.

## वृद्ध इसमाचा आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील लोटस सिटी स्कॅन समोरील नवनाथ मंदिराजवळ एका वृद्ध इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ६४ ते ६५ वर्षे, रंग काळा सावळा, अंगाने कृश, उंची अंदाजे ५ फूट, डोक्याचे व दाढीचे केस वाढलेले पांढरे, चेहरा उभट, नाक सरळ आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पो. ना.विलास सातामकर यांच्याशी संपर्क साधावा.

## बालिका दिनानिमित्त संपन्न झालेल्या चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

भारतभर जागरूकता अभियान व पोहोच कार्यक्रमातंर्गत आंतरराष्ट्रीय बालिका दिनानिमित्त संपन्न झालेल्या चित्रकला स्पर्धे तील विजेत्यांचा मान्यवरांचे हस्ते पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. बेटी बचाओ-बेटी पढाओ रँलीचे आयोजन करून बालिका दिन उत्साहात संपन्न करण्यात आला. भारतभर जागरूकता अभियान व पोहोच कार्यक्रमातंर्गत राष्ट्रीय विधी प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार व दिवाणी न्यायाधीश क स्तर रोहा तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती रोहा यांच्या वतीने दि.२ ऑक्टो. ते १४ ऑक्टो.या कालावधीत सदरील अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने अधिकार क्षेत्रातील रोहे तालुक्यातील कोएसो मेंहेंदळे हाय.रोहा,द.ग.तटकरे माध्य.विद्या.कोलाड, गु.रा.अग्रवाल हाय. नागोठणे व न्यू इंग्लिश स्कूल चणेरा या चार केंद्रावर इ.५ वी ते ७ वी व इ.८ वी ते १० वी या गटातील विद्यार्थ्यांकरिता आंतरराष्ट्रीय बालिका दिनानिमित्त चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत गट इ.५ वी ते ७ वी प्रथम क्र. स्नेहल गोरखनाथ देशमुख,खांब हायस्कूल,द्वितीय क्र.संचिता पाचकावडे कुडली,तुतीय क्र.,कुणाल केशव मोहिते खांब,चतुर्थ क्र.नम्रता पवार कुडली,पंचम क्र.साहिल यादव एमपीएसएस कोलाड तर गट ८ वी ते १० गट प्रथम क्र.अथर्व चितळकर, द्वितीय क्र. आर्या तेलंगे खांब,तुतीय क्र.अमन गुप्ता कोलाड,चतुर्थ क्र. आकाश भोईर चिल्हे,पंचम क्र.शुभम कोंडे चिल्हे यांनी पटकावले आहे.

# अवकाळी पावसामुळे वालाचे पीक धोक्यात

**दै.रायगड नगरी । वाकण**

नागोठणे विभागात सर्वच परिसरामध्ये बुधवार दि.१७ रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास अचानक सुरु झालेल्या अवकाळी पावसामुळे वाल पीक जमीनींचे तसेच भाताचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले त्यामुळे वाल पीकालाही धोका निर्माण झाला आहे. तसेच लग्नाचे मुहूर्त असल्याने असल्याने काही ठिकाणी लग्नासाठी बांधण्यात आलेल्या मंडपाच्या कापडाचे देखील नुकसान झाले आहे.



दोन ते तीन दिवसांपासून वातावरणात मोठ्या प्रमाणात गरमी वाढलेली होती. जणु काही अवकाळी पाऊस येणार की काय अशी चिन्हे दिसत असतांनाच बुधवार (दि.१७) रोजी दुपारी २ वाजता ढगांच्या गडगडाटासह जोरदार पावसाने सुरुवात केली. परंतु या मुसळधार झालेल्या अवकाळी पावसामुळे अंतिम टप्यात सुरू असलेल्या भात झोडणा-या शेतक-यांची चांगलीच तारांबळ उडवली. अनेक ठिकाणी भात झोडण्याची कामे सुरु असतांनाच अचानक पावसाने जोरदार सुरुवात केल्यामुळे संपुर्ण भात पावसात भिजल्यामुळे भाताचे भरपुर नुकसान झाले आहे. हाता तोंडाशी आलेला घास शेतक-यांच्या हातातुन गेल्यामुळे शेतकरी चिंतेत पडला आहे.

तसेच तुळशी विवाहरंभ पार पडल्यानंतर लगेचच सर्वत्र लग्नाचे बार उडत असतात. म्हणुनच काहींनी तर लग्न कार्यासाठी मंडप बांधले होते. परंतु या पडलेल्या पावसामुळे मंडपवाल्यांचेही अतोनात नुकसान झाले आहे. गेल्या वर्षी कोरोनामुळे अनेक लग्नकार्य रद्द झाल्यामुळे याचा फटका मंडपवाल्यांना बसला होता. त्यामुळे या अवकाळी पावसामुळे शेतकरी वर्गासह मंडप व्यावसायिकांच्या चिंतेतही भर पडली आहे.

दरम्यान बाळसई येथे भातझोडणी सुरु असतांनाच अचानक झालेल्या पावसामुळे नुकसान झालेल्या भाताची कृषी सहाय्यक अधिकारी एस.आर.भोईर, ग्रा.पं सदस्य किशोर नावले, सामाजिक कार्यकर्ते अंनत ठमके, दत्ताराम पाटेकर यांनी जाऊन पाहणी केली व शासनाकडुन जेवढे शक्य होईल तेवढी नुकसान भरपाई मिळवुन देण्याचे आश्वासन शेतक-यांना दिले.

## भिवपुरी रोड रेल्वे स्थानकावर प्रवासी संघटनेचे वर्धापनदिन साजरा

**दै.रायगड नगरी । कर्जत**

भिवपुरी रोड रेल्वे स्थानक येथे १७ नोव्हेंबर २०१९ रोजी रेल्वे प्रवासी संघटनेची स्थापना करण्यात आली तर या संघटनेचा दुसरा वर्धापनदिन साजरा करण्यात आला तर दोन वर्षा पूर्वी जे प्रावसी असायचे ते जेव्हा मालागाडी या स्थानकार उभे राहात होत्या

तेव्हा हे प्रावसी मालगाडी खालून रेल्वे कोर्स करत होते मात्र या दोन वर्षांच्या आगोदर या स्थनकावर अनेक घटना घडल्या होते त्यामूळे प्रावसी संघटनेन कर्जत व नेरळ कडील ब्रिज ची मागणी केली व दोन वर्षामधे या हे काम पूर्ण झाल्यामुळे जे प्रवासी मालगाडी खालून जात होते ते आता ब्रिजवरून प्रवास करू लागले या भागातील प्रवासीना कुठल्याही प्रकारचे भीती राहिली नाही यांना रेल्वे स्थानकावर जाने सोपे पडले. रेल्वे प्रवासी संघटनेकडून ज्या मागण्या करण्यात आल्या या मागण्या ८०% पूर्ण झालेल्या जी प्रवासी संघटनाने खुप चागले प्रकारे कामे करून घेतले आहे प्रवासी वर्ग खूप आनंद झालेला आज दिसून येत आहे. तर २० % मागणी प्रोसेस मध्ये आहेत नेरळ व कर्जत या दोन्ही बाजूंना लिप होणार प्रवासी संघटनेचे अध्यक्ष किशोर गायकवाड यांच्याकडून प्रवासी वर्धापनदिन साजरा करण्यात आला यावेळी येथे बोलण्यात आले तर या मागण्या पूर्ण करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने या संघटनेला चांगल्याप्रकारे प्रतिसाद देण्यात आला. तर कोरोना काळामध्ये काही लोकांना रेल्वे प्रशासनाकडून तिकडे दिली जाता नव्हते ज्या लोकांना गरज आहे अशा लोकांना तिकीट दिले जावे अशी मागणी भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटना यांच्याकडून मागणी करण्यात आली यामूळे ज्या लोकांना गरज आहे अशा लोकांना तिकिट मिळून देण्याचे काम रेल्वे प्रवासी संघटनेचे मागणी नुसार मान्यता देण्यात आली. भिवपुरी रोड रेल्वे स्थानकावर जाणारा जो रस्ता आहे हा रस्ता होण्यासाठी भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटना यांच्याकडून खासदारांनकडे मागणी करण्यात येणार आहे असे मत रेल्वे प्रवासी संघटना भिवपुरी रोड अध्यक्ष किशोर गायकवाड यांच्याकडून सांगण्यात आले दुसऱ्या वर्धापन दिनाला रेल्वे प्रवासी संघटना भिवपुरी रोड या संघटनेचे अध्यक्ष रायगड भूषण किशोर गायकवाड, कार्यध्यक्ष गणेश मते, खजिनदार महेश कडव, सचिव विनोद बार्णकर ,सल्लागार उत्तम गायकवाड, अशोक गायकवाड, रविंद्र राऊत, जीवक गायकवाड, माधव चव्हाण, पंकज बुंधाटे,तेजस तुपे, तसचे भिवपुरी रोड रेल्वे स्थानकाचे स्टेशन मास्तर सुरेश कुमार, हिरा खामगर, संतोष जाधव, कोमल पांचाळ , महेंद्र परदेशी, इत्यादी उपस्थित होते.




## आदिनाथ संस्थेकडून शालेय परिसराची स्वच्छता

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील धानकान्हे येथील सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या श्री. आदिनाथ सामाजिक संस्थेकडून विद्यालयाची साफसफाई व स्वच्छता करून सामाजिक बांधिलकीचा वसा जपला.

येथीलच नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे या ग्रामीण भागातील विद्यालयात पावसाळ्यात वाढलेली मोठ्या प्रमाणावर झाडी झुडपे सद्यस्थितीत धोकादायक वाटत होती. त्यातच शासकीय कोरोना नियमावलीनुसार व स्थानिक प्रशासन यंत्रणा यांच्याशी सल्लामसलत करून विद्यालय सुरू करण्यात आले आहे.

दिवाळी सुट्टीनंतर शाळा सुरू झाल्या आहेत. अशावेळी विद्यार्थी वर्गाला अडचणीचे होऊ नये यासाठी आदिनाथ सामाजिक संस्था धानकान्हे यांच्या वतीने विद्यालयाचे संपुर्ण परिसराची स्वच्छता करून सामाजिक बांधिलकी तर जपलीच या शिवाय आपले उत्तरदायित्वही निभावले.सामाजिक बांधिलकीचे नात्यातून आदिनाथ सामाजिक संस्थेकडून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे समाजातील सर्वच स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.

## कु.हर्षा विनोद शिंदे आर्किटेक्चर परीक्षेत उत्तीर्ण

**दै.रायगड नगरी । माथेरान**

नुकताच मिस हेरिटेज इंडिया स्पर्धेत विजयश्री प्राप्त करून आपली शैक्षणिक क्षेत्रात सुध्दा उल्लेखनीय कामगिरी पार पाडत माथेरानच्या माजी नगरसेविका तथा मराठा समाजाच्या जेष्ठ कार्यकर्त्या वासंती वामन जांभळे यांची नात आणि उद्योजक विनोद जांभळे (शिंदे), रेश्मा विनोद शिंदे यांची कन्या कु हर्षा विनोद शिंदे ही आर्किटेक्चर परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

सध्या महाबळेश्वर येथे वास्तव्यास असलेल्या ह्या कुटुंबातील हर्षाने माथेरान सह महाबळेश्वर या पर्यटनस्थळाचे नाव उंचावले आहे. तिच्या या सर्वगुणसंपन्न असलेल्या उत्तुंग भरारी साठी आणि पुढील भावी काळात उत्तरोत्तर यशाची शिखर पादाक्रांत करत सर्व प्रकारच्या मनोकामना पूर्ण होवोत यासाठी सोशल मीडियावर सुध्दा सर्व स्तरातून कौतुकाचा आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



## स्व.बाळासाहेब ठाकरे यांचा ९ वा स्मृतीदिन साजरा

**दै.रायगड नगरी । तळा**



शिवसेना तळा शाखेचे वतीने हिंदु हृदय सम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांचा ९वा स्मृती दिन शाखेत साजरा करण्यात आला. यावेळी तालुका प्रमुख प्रधुम्न ठसाळ, उपतालुका प्रमुख शरद सारगे, शहर प्रमुख राकेश वडके, नगरसेवक विठोबा चांडीवकर जेष्ठ शिवसैनिक डॉ मनोज पाथरे, लिलाधर खातू अतूल क्षिरसागर सहदेव पारधी नरेश सुर्वे, अमेय लोखंडे, दिपक चिंचाळकर, नझीर पठाण, सिराज खाचे, रघुनाथ वाघरे, नाना रिसबुड, बंड्या सुतार, तुकाराम शिगवण शिवसैनिक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी शिवशाहीर स्वर्गीय बाबासाहेब पुरंदरे यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.


### जाहीर नोटीस

अर्जदाराचे वकील : ॲड.विजया म्हात्रे

दि.चौ.अर्ज क्र.१७९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२०/१२/२०२१

१) श्रीम.शकुंतला विश्वास म्हात्रे
वय : ४४ वर्षे, व्यव : गृहिणी
२) कु.प्रणिता विश्वास म्हात्रे
वय : २२ वर्षे, व्यव : शिक्षण
३) कु.श्रृती विश्वास म्हात्रे
वय : १९ वर्षे, व्यव : शिक्षण
४) कु.आदिती विश्वास म्हात्रे
वय : १४ वर्षे, व्यव : शिक्षण
५) कु.कार्तिक विश्वास म्हात्रे
वय : ११ वर्षे, व्यव : शिक्षण
अनु क्रं.१ ते ५ सर्व रा.जासई,
ता.उरण, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६
६) सौ.विनिता महेश म्हात्रे पुर्वाश्रमीचे नाव
विनिता विश्वास म्हात्रे
वय : २५ वर्षे, व्यव : गृहिणी
रा.शिवाजी नगर, रुपम सिनेमा जवळ,
सायन कोळीवाडा, मुंबई, महाराष्ट्र ४०००२२ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

या जाहीर नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, वरील अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ ते ६ यांचे वडील कै.विश्वास परशुराम म्हात्रे हे दि.२९/०७/२०२१ रोजी मु.पो.जासई, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहे. सदर मयत व्यक्तीस खालीलप्रमाणे वारसदार आहेत.

त्यांचे नावे असणाऱ्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे...

**अ) जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : जासई, ता.उरण, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| जासई | १०३ | ६ अ | 0.0१.00 | २.0४ |
| | ११५ | १ | 0.0२.00 | 0.0६ |
| | ११५ | ३ | 0.0५.८0<br>पो.ख. 0.0३.२0 | 0.१३ |

कै.विश्वास परशुराम म्हात्रे हे मयत झालेले आहेत. ते हयात असताना यांचे वडील कै.परशुराम नारायण म्हात्रे व त्यांची आई कै.गंगाबाई परशुराम म्हात्रे यांच्या नावे असणाऱ्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीची ह्या सरकारतर्फे सिडकोने नव्या मुंबई योजनेसाठी भूसंपादीत केल्या आहेत. त्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**ब) भुसंपादीत जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : जासई, ता.उरण, जि.रायगड**

| युनिट केस / अवार्ड नं. | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| जासई -१५५/१५३ | १७५ | ११/अ | 0.१८.00 | 0.२८ |
| | २३६ | ५ | 0.३३.00 | ३.९५ |
| | २३९ | ९ | 0.0२.00 | 0.0२ |
| जासई -१५५/२९५ | ५ | २१ | 0.0६.१२ | 0.१२ |
| जासई -१०/९० | १०३ | ६ अ पैकी | 0.६७.00 | २.१५ |
| जासई -१४३/१४४ | २३४ | ११ | 0.0१.0८ | 0.१९ |

येणेप्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे कै.विश्वास परशुराम म्हात्रे यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१३/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः खोपोली नगर परिषद हद्दीतील लोकांना आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते ते खालीलप्रमाणे. मौजे : शेडवली, ता.खालापूर, जि.रायगड येथील नगरपरिषद खोपोली यांच्या हद्दीतील स.नं.२७, हि.नं.६, स.नं.२८, हि.नं.१५ ब व सिटी सर्व्हे नंबर ११६४ व ११६५ या मिळकतीचे तथाकथित अखत्यार पत्र क्र.९६३/२०१८ रद्द केले संदर्भी तथाकथित अखत्यारी अशोक श्रीपत भारती व ओळख देणार जितेंद्र भारती व शंकर शिंदे यांना नोटीसने कळविले असून त्याचे जाहीर प्रकट खालीलप्रमाणे.

आमचे अशिल श्रीमती.शांता उर्फ सुनिता सुनील भोसले २) सायली सुनील भोसले ३) राणी सुनील भोसले सर्व रा.मौजे : शेडवली, ता.खालापूर, जि.रायगड यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रांवरुन तुम्हास या जाहीर नोटीसने प्रकट करून कळविण्यात येते की, मौजे : शेडवली, ता.खालापूर, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे आमचे अशिलांनी तुम्हास दिलेले तथाकथित नोंदणीकृत अखत्यार दस्त क्रमांक ९६३/२०१८ आमचे अशिलांनी खालील नमूद कारणावरुन रद्द करण्याचे ठरविले आहे.

१) आमचे अशिलांनी या तथाकथित अखत्यारपत्रे अवलोकन केले जात असता सदर दस्तामधील नमूद मजकूर खोटा, बनावट, रचनात्मक अशा आशयाचा असून आमच्या अशिलांना मान्य नाही. आमचे अशिलांनी तुम्हाला या अखत्यारपत्रात नेमका कामाचा तपशिल देण्यात आलेला होता. वास्तविक पाहता तुम्हास नेमके कोणते अधिकार दिलेले आहेत याची जाणीव व माहिती होती व आहे. तरी देखील स्वतःच्या स्वार्थासाठी तुम्ही सदर अखत्यारपत्राचा गैरवापर करत आहात. सदरचे अखत्यारपत्राने आमचे अशिलाने तुम्हाला दिलेले अधिकार रद्द करून या नोटीसीने काढून घेतलेले आहेत. तुमचे अप्रामाणिक लबाडीवर आमच्या अशिलांचे कायदेशीर हक्क लाटण्याचा अर्थात बुडविण्याचे हेतूने या तथाकथित अखत्यारपत्राचा गैरवापर करून पुढील साठेकरार व खरेदीखत अथवा इतर त्रयस्थ व्यक्तीस सदरील मिळकत हस्तांतरीत करण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. म्हणून तुमची लबाडी व फसवणूक सदरचे दस्ताची अवलोकन करून स्पष्ट दिसून येत आहे.

२) सबब यापुढे तुम्ही या तथाकथित अखत्यारपत्र दस्त क्रमांक ९६३/२०१८ चे अन्वये कोणतेही काम अथवा दिलेल्या अधिकारान्वये अंमल करण्याचा अथवा वापरण्याचा नसून यापुढे हक्क दाखविण्याचा नाही. या नोटीसीने तुमचे सर्व अधिकार दि.०८/०३/२०१८ चे अखत्यारपत्र दस्त क्रमांक ९६३/२०१८ ने प्राप्त सर्व अधिकार रद्द केलेले आहेत. याची कृपया तथाकथित अखत्यारी तुम्ही नोंद घ्यावी.

३) तरी ही नोटीस देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांचा मौजे : शेडवली येथील मिळकत सिटी सर्व्हे नंबर ११६४, ११६५ सर्वे नंबर २७/६, २८/१५ ब या मिळकतीचे तथाकथित अखत्यारी श्री.अशोक श्रीपत भारती व ओळख देणारे श्री.जितेंद्र जगन्नाथ भारती (माणकिवली), श्री.शंकर लंबाजी शिंदे (शेडवली) यांचेबरोबर केलेली कोणतीही कामे अथवा कोणताही व्यवहार केल्यास आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी तो बेकायदेशीर ठरेल व त्यावर होणाऱ्या कायदेशीर कारवाईस व खर्चास संबधित व्यक्ती जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : खालापूर
दिनांक : १७/११/२०२१

सही/-
अशिलांतर्फे ॲडव्होकेट
ॲड.एम.एम.मालकर
श्रीस्मरण बंगला, प्लॉट नं.८, गणेशनगर, रिस,
पो.मोहोपाडा, ता.खालापूर, जि.रायगड ४१०२२२
मो.नं. ९९७०१११६२०

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी मौजे : पळसदरी, ता.कर्जत, जिल्हा : रायगड येथील खालील तपशिलवारप्रमाणे नमूद केलेल्या मिळकती संबंधित मिळकतींचे मालक श्री.दत्तात्रय प्रभाकर दरेकर यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाचा व्यवहार संदर्भित मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिलांचे दरम्यान झाला आहे.

संदर्भित मिळकती पूर्णतः निर्वेध, बोजाविरहित व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउप्परही सदर मिळकतीत अथवा त्यापैकी कोणत्याही भागात अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, अधिकार, वापर, वहिवाट, कब्जा, गहाण, दान, करार-मदार, पोटगीचा हक्क व इतर हक्क असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे अवधीत तशी लेखी हरकत माझ्याकडे कागदोपत्री पुराव्यानिशी नोंदवून माझी खात्री पटवून द्यावी.

विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पळसदरी, ता.कर्जत, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | २४ | १ | ०-७८-७०<br>पो.ख. ०-१४-३०<br>०-९३-०० | ८.७२ |

सही/-
सौ.अमृता अशोक नाईक
(ॲडव्होकेट व नोटरी)

पत्ता : शॉप नं.७, योगेश्वर कृपा को.ऑप.हौ.सो.,
चिंतामणी हॉलसमोर, जुना ठाणा नाका रोड,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
फोन नं. ९९७५५४७२५०/ ९९३०८८८४०८

### जाहीर नोटीस

अर्जदारातर्फे वकील
ॲड.राजेश श्रीधर पाटील

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रिमिनल एम.ए.क्र.११७०/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२१/१२/२०२१

श्री.कबीर बी अहमद
वय : ४५ वर्षे, धंदा : नोकरी
रा.ट्रेनिंगशिप रहमान,
मु.पो.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत न्हावे
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.कबीर बी अहमद, रा.ट्रेनिंगशिप रहमान, मु.पो.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड यांचा मुलगा कु.हसन जमाल कबीर अन्सारी यांचा जन्म दि.०४/१०/२००३ रोजी किंवा त्या सुमारास मौजे : न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे आणि अर्जदार यांनी कु.हसन जमाल कबीर अन्सारी याचे जन्माची उशिरा नोंद होणेकरिता आदेश मिळणे बाबत पनवेल येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांचे न्यायालयात सदरचा चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू अर्जदार यांचा मुलगा कु.हसन जमाल कबीर अन्सारी हा वर नमूद ठिकाणी जन्मलेला आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून कु.हसन जमाल कबीर अन्सारी याचे जन्माची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.१७/११/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल

# संक्षिप्त...

## मनसे रोहा तालुका सचिवपदी साईनाथ धुळे व महिला तालुका अध्यक्षपदी दिपश्री घासे

**दै.रायगड नगरी । वाकण**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष देवेंद्र गायकवाड व जिल्हा सचिव अमोल पेणकर यांच्या नेतृत्वाखाली नागोठणे येथील मनसेचे कार्यकर्ते साईनाथ धुळे यांची मनसे रोहा तालुका सचिवपदी व दिपश्री किरण घासे यांची मनसे महिला तालुका अध्यक्षपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली असून हे नियुक्ती पत्र मनसे प्रमुख राजसाहेब ठाकरे व युवा नेते अमितसाहेब ठाकरे यांच्या हस्ते देण्यात आली.

दरम्यान ही नियुक्ती एक वर्षाच्या कालावधीसाठी असून आपल्या कार्य अहवाल पाहूनच पुढील मुदतवाढी संदर्भात निर्णय घेतला जाईल असा उल्लेख या नियुक्ती पत्रात स्पष्टपणे केला आहे.

## एस. एस. सी. बॅच १९९२-९३ च्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

**दै.रायगड नगरी । उरण**

जुन्या मित्र-मैत्रिनींच्या आठवणींना उजाळा मिळावा, बालपणातले, शाळेतले दिवस प्रत्येकाच्या आठवणीत राहावे, तसेच मैत्री वृद्धिंगत करण्याच्या दृष्टिकोनातून रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन व भागशाळा खोपटे एसएससी बॅच सन १९९२-९३ च्या बॅच मधील शाळेत शिकणारे सर्व वर्ग मित्रांनी एकत्र येत दुसरे वार्षिक स्नेह संमेलन रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन येथे मोठ्या उत्साहात साजरा केला. सर्वप्रथम मित्र-मैत्रिणींचे स्वागत आणि अल्पोपाहार करण्यात आले.प्रतिमेचे पूजन स्कुल कमिटी चेरमन जीवन गावंड, हायस्कूलच्या ज्येष्ठ शिक्षिका बल्लाळ मॅडम, पिरकोन गावचे सरपंच रमाकांत जोशी यांच्या हस्ते करण्यात आले.पत्रकार विठ्ठल ममताबादे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली.यावेळी त्रैलोक्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष नित्यानंद म्हात्रे यांच्याहस्ते उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले,शिक्षक एल एन भगत ,गाढे सर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. त्यानंतर त्रैलोक्य प्रतिष्ठानची अधिकृत घोषणा, प्रतिष्ठान चे उद्दिष्ट सभासदांना, उपस्थितांना पटवून देण्यात आले. त्रेलोक्य प्रतिष्ठानच्या फलकाचे अनावरण ऍडव्होकेट विक्रांत घरत यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.तदनंतर ॲडव्होकेट विक्रांत घरत यांनी उपस्थितांना उत्तम मार्गदर्शन केले.


**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये प्राधान्य मिळालेच पाहिजे : महेंद्र घरत

**दै.रायगड नगरी । उरण**



कामगार नेते महेंद्र घरत यांनी रायगड काँग्रेस जिल्हा अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून जसे रायगड काँग्रेसमध्ये नवचैतन्य आले आहे. तसेच न्यू मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेमध्ये सुद्धा कामगारांचा ओघ दिवसेंदिवस वाढत आहे. नामफलक अनावरणासाठी अनेक कंपन्यातील कामगार प्रतीक्षेत आहेत. त्यातील मे. ग्लोबिकॉन, कोप्रोली व स्थानिक टेम्पो चालक असोसिएशन या दोन कंपन्यातील संघटनेच्या नामफलकाचे अनावरण दिनांक १७ नोव्हेंबर २०२१ रोजी रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष तथा न्यू मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष महेंद्र घरत यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

जानेवारी २०२१ पासून १५ नवीन कंपन्यांतील कामगारांनी कामगार नेते महेंद्र घरत यांचे नेतृत्व स्वीकारले आहे, तर १२ कंपन्यातील कामगारांसाठी आतापर्यंत पगारवाढीचे करार करण्यात आले आहेत. संघटनेच्या याच कार्यशैलीवर प्रभावित होऊन कामगार न्यू मॅरीटाईम ॲन्ड जनरल कामगार संघटनेकडे आकर्षिले जात आहेत.

नामफलक अनावरण प्रसंगी संघटनेचे सरचिटणीस वैभव पाटील, उपाध्यक्ष किरीट पाटील, विनोद म्हात्रे, प्रेमनाथ ठाकूर, जेष्ठ काँग्रेस कार्यकर्ते राम भगत, महेंद्र ठाकूर, भाई म्हात्रे, रेखा घरत, निर्मला पाटील, संघटक लंकेश ठाकूर, कल्पना ठाकूर, योगेश रसाळ, आदित्य घरत, अरुण पाटील, अरुण म्हात्रे, विवेक म्हात्रे, सुजित म्हात्रे, अंगत ठाकूर, संदीप म्हात्रे, प्रांजल भोईर, राजाराम ठाकूर, आनंद ठाकूर तसेच मोठ्या संखेने कामगार व काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

## उरण पोलीस ठाण्याकडून रूट मार्चचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्रातील काही शहरांमध्ये हिंसक आंदोलन आणि तणावग्रस्त परिस्थिती निर्माण झाली. या प्रकारावर केंद्रीय गृहमंत्रालयानेही स्पष्टीकरण दिले आहे. त्रिपुरामध्ये मशिदीला कुठल्याही प्रकारे नुकसान अथवा तोडफोड झाली नाही. सोशल मीडियावर पसरवण्यात येणाऱ्या बातम्या चुकीच्या आणि बनावट आहेत. सोशल मीडियावरून लोकांची दिशाभूल करणारी माहिती पसरवली जात असल्याचे गृहमंत्रालयाने सांगितले आहे. उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रवींद्र बुधवंत यांनीही अफवांना बळी पडू नका, असे आवाहन केले आहे.

सध्या महाराष्ट्रात उद्भवलेल्या जातीय घटनांच्या अनुषंगाने पोलीस उपायुक्त परिमंडळ २, सहाय्यक पोलीस आयुक्त पोर्ट विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र बुधवंत यांच्या मार्गदर्शनाखाली उरण पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलीस परिस्थिती सांभाळण्यासाठी समर्थ असून सतर्क आहेत आणि जनतेमध्ये तसा संदेश देण्यासाठी पोर्ट विभागातील पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांचे रूट मार्च चे आयोजन करण्यात आले होते.

## विद्यार्थ्यांना जातीचे दाखले वाटप करण्यासाठी समाज कल्याण विभाग विशेष अभियान राबविणार : डॉ.प्रशांत नारनवरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



विद्यार्थ्यांना जातीचे दाखले मिळण्यास अनेक अडचणी येतात. याकरिता सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृह, निवासी शाळा, समाजकार्य महाविद्यालय, अनुदानित वसतिगृह तसेच जिल्हा परिषदेच्या महानगरपालिका व नगरपालिकेच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना जातीचे दाखले त्वरीत मिळावे यासाठी समाज कल्याण अधिकारी यांनी ग्रामीण व शहरी भागात शिबिरे घेवून जातीचे दाखले मिळवून देण्यासाठी विशेष अभियान सुरु करावे, असे निर्देश समाज कल्याण विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी दिले आहेत.

कोकण भवन येथे मंगळवारी झालेल्या मुंबई विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. विद्यार्थ्यांना जातीचे दाखले मिळण्यास अडचणी येत असतात. त्यामुळे जे विद्यार्थी समाज कल्याण विभागाच्या अनुदान शाळा, शासकीय वसतिगृह अनुदानित वसतिगृह, समाजकार्य महाविद्यालय इत्यादीमध्ये शिक्षण घेत आहेत. त्यांना व इतर विद्यार्थ्यांना जातीचे दाखले त्वरीत मिळण्यासाठी संबंधित जिल्हयाच्या सहाय्यक आयुक्त, जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी कॅम्प आयोजित करावेत, जेणेकरून संबंधित विद्यार्थ्यांना जातीचे दाखले त्वरीत मिळण्यास मदत होईल.

सामाजिक न्याय विभागातर्फे विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजना १००% लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी सामाजिक न्याय विभागातर्फे वस्ती संपर्क अभियान हा नवीन उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत प्रत्येक शासकीय अधिकाऱ्याने आठवडयातून एक दिवस ग्रामीण व शहरी भागातील वस्तीमध्ये जाऊन लोकांशी संपर्क साधने अभिप्रेत आहे. तेथे जाऊन संबंधित अधिकाऱ्यांनी मुलांच्या शिक्षण व आरोग्याचे आरोग्य विषयक योजनेविषयी माहिती देणे, विविध योजनांच्या लाभार्थ्यांचे फॉर्म भरून घेणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे हे अभिप्रेत आहे. लवकरच हा उपक्रम सुरु करण्यात येणार आहे व शासनाच्या इतर विभागाच्या विभागांना यामध्ये सहभागी करुन घेण्यात येणार आहे असेही यावेळी डॉ. नारनवरे यांनी सांगितले. या बैठकीत सामाजिक न्याय विभागामार्फत मुंबई विभागात सुरु असलेल्या विविध योजनांचाही आढावा घेण्यात आला.

या बैठकीस प्रादेशिक उपायुक्त श्रीमती. वंदना कोचुरे, उपायुक्त श्री. रविंद्र कदम पाटील, सहाय्यक आयुक्त श्री. भारतकुमार केंद्रे आदि अधिकारी उपस्थित होते.

## मा.आ.मनोहर भोईर यांच्याकडून बाळासाहेबांना विनम्र अभिवादन

**दै.रायगड नगरी । उरण**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या नवव्या स्मृतीदिना निमित्त मुंबईत शिवाजी पार्क येथील स्मृतीस्थळावर उरणचे माजी आमदार तथा शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख मनोहर भोईर यांनी बाळासाहेबांच्या स्मृतीस आदरांजली वाहिली.

स्मृतीस्थळावर सुंदर फुलांची आरास करण्यात आली होती. राज्याच्या कानाकोपऱ्यातून शिवसैनिक बाळासाहेबांना आदरांजली वाहण्यासाठी दाखल झाले होते. काल बुधवार दि. १७ ऑक्टोबर २०२१ रोजी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या पवित्र स्मृतीस दादर शिवाजी पार्क येथील स्मृतीस्थळावर उरणचे माजी आमदार मनोहर भोईर तसेच त्याच्या सोबत असलेले उरण विधानसभा संपर्कप्रमुख महादेव घरत, उरण तालुका प्रमुख संतोष ठाकूर, उपतालुकासंघटक अमित भगत, ग्रा.पं. सदस्य धनेश ठाकूर यांनीही शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन केले.



# २०22 च्या माथेरान नगरपरिषदेच्या निवडणूक जाहीरनाम्यात सर्वपक्षीयांचे जुनेच मुद्दे असणार

**दै.रायगड नगरी । माथेरान**



माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुकीत सगळेच पक्ष आपापल्या परीने आणि जिवाच्या आतंकाने, पोटतिडकीने विविध मुद्दे, विषय आपल्या जाहीरनाम्यात प्रसिध्द करून गावभर पत्रके वाटत असतात. यातील हाताच्या बोटावर मोजण्याइतकी कामे पूर्ण केली जातात यात शंकाच नसते परंतु अनेकदा जी महत्वाकांक्षी कामे आजही मागील पंचवीस वर्षात आजवरच्या सर्वच सत्ताधारी गटांकडून प्रलंबित राहिली आहेत ती पूर्ण करण्यासाठी सगळ्यांना अपयश आले आहे त्यामुळेच सत्तेत असताना सुध्दा होणारी कामे का पूर्ण होत नाहीत यामागच्या गुढाची स्थानिकांना उकल होत नाही.

फेब्रुवारी २०२२ मध्ये माथेरान नगरपरिषदेची निवडणूक होण्याची शक्यता आहे त्यामुळे अगदी थोडा वेळ सर्वपक्षीयांसमोर राहिल्याने सध्यातरी युत्या आघाड्या निश्चित करण्यात आलेल्या नाहीत त्यातच छुपे उमेदवार सुध्दा आरक्षण काय पडणार याच विवंचनेत दिसत आहेत त्यामुळे त्यांनी सुध्दा आपण कोणत्या पक्षाच्या तिकिटावर उमेदवारी पारड्यात पाडून घ्यायची याबाबत कमालीची गुप्तता पाळलेली आहे. याही वेळेला दर निवडणुकी प्रमाणे पोकळ आश्वासने देण्यासाठी पक्षांना एम.पी. ९३ हा दस्तुरी पार्किंगचा मुद्दा निश्चितपणे असणार आहे. कारण माथेरानचे मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी कार पार्किंग मध्ये अपुऱ्या जागेमुळे वाहतूक कोंडी नेहमीच होत असते.याच ठिकाणी रिक्त असलेल्या एम.पी. ९३ ह्या भूखंडा वरील अतिक्रमणे दूर केल्यास मोठया प्रमाणावर वाहनांच्या पार्किंगची सोय उपलब्ध होऊ शकते.

परंतु आजवरच्या कार्यकाळात हा प्रश्न कुणीही मार्गी लावलेला नाही.झोपडपट्टीला आजतागायत अनधिकृत शिक्का लागलेला आहे त्या अधिकृत करण्यासाठी आम्ही नक्कीच प्रयत्नशील आहोत हे सुध्दा सांगण्यात येऊ शकते.महिलांसाठी स्वयंरोजगार निर्मिती करू तसेच सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देऊ, जेष्ठांसाठी अद्ययावत सोयीसुविधा, बेरोजगाराना व्यवसायाचे साधन मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील,पर्यटकांच्या वाढीसाठी प्रयत्न करणार हेच जुने मुद्दे सर्वपक्षीय आपापल्या जाहीरनाम्यात नमूद करणार असल्याने मतदार राजाकोणत्या पक्षावर विश्वास ठेवून आपला मतदानाचा हक्क बजावेल हे औत्सुक्याचे आहे.

## एकता सांस्कृतिक महोत्सव २०२१-२२ चे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

३३वा एकता सांस्कृतिक महोत्सव गिरगाव येथील साहित्य संघ नाटयमंदिर येथे आयोजित करण्यात आला असून या महोत्सवाच्या अनुषंगाने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात सहभाग होण्याचे आवाहन एकताचे अध्यक्ष प्रकाश गणपत जाधव यांनी केले आहे.

२४ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी १० वाजता अभिनय, गायन, काव्यवाचन, एकेरी नृत्य, दुहेरी नृत्य, समूह नृत्य, चित्रकला इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख - १९ डिसेंबर असून समूह नृत्यासाठी प्रथम, द्वितीय, तृतीय, १००००, ७०००, ५००० रु. सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र तसेच स्पर्धेत भाग घेणाऱ्या कलावंतांना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येतील. असे एकताचे सचिव प्रकाश पाटील यांनी एका पत्राद्वारे जाहीर केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क- मुंबई विभाग- ९२२०८९९१२०/ ८१७७८७०५८६, वैशंपायन- ९८२०२०९५१६ ठाणे विभाग- वृषाली शिंदे- ९९६९४८४३२८, डोंबिवली, कल्याण, बदलापूर विभाग- भाग्यलक्ष्मी पडसळगीकर- ९८९२५०३१०१/ सुष्मा देशपांडे- ९८६७७५६७११ विरार विभाग- विशाल संगारे- ९७६४५६२५९४ रोहा- आरती धारप - ९६३७०९१८११

## विजय दरेकर यांना वसंत डावखरे स्मृती पुरस्कार आदर्श शिक्षक पुरस्कारामुळे विशेष गौरव

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील कोतवाल बुद्रुक गावाचे सुपुत्र आणि राज्याच्या विधानपरिषदेचे विरोधीपक्षनेते आ. प्रवीण दरेकर यांच्यापासून सदैव प्रेरणा घेत शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात आदर्शवत वाटचाल करणारे माध्यमिक शिक्षक विजय गोपाळराव दरेकर यांना यंदाचा कोकण विभाग वसंत डावखरे स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार सन २०२१ प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी केंद्रीय पंचायत राज्यमंत्री ना.कपिल पाटील व विधानपरिषद सदस्य आ. निरंजन डावखरे, आमदार संजय केळकर, आमदार प्रशांत ठाकूर, माधवीताई नाईक आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत माध्यमिक शिक्षक विजय दरेकर यांनी पुरस्कार स्विकारला. पोलादपूर तालुक्यातील उमरठ, साखर, लोहारे आणि कोतवाल येथील माध्यमिक प्रशाला असलेल्या नर्मदेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या माऊली प्रशाला कोतवाल येथे माध्यमिक शिक्षक असलेल्या विजय दरेकर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे पोलादपूर तालुक्यात सर्वत्र स्वागत होत आहे.


**पनवेल महानगरपालिका**

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | श्री.डी.एल.साहो, (साहो निवास) प्लॉट नं. ई १०६, रो हाऊस सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई | ०१ जंगली सुकलेले मृत झाड | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-अ खारघर विभागातील प्लॉट नं.ई-१०६, रो हाऊस, सेक्टर १२ येथील साहो निवासच्या समोरील झाड सुकलेले असून पूर्ण जीर्ण झालेले आहे. सदरचे झाड कधीही पडू शकते. तेथील रहिवाशी व चालणाऱ्या लोकांच्या जीवाला धोका असून, इमारतीला नुकसान होवू शकते. तरी ०१ जंगली सुकलेले मृत झाड तोडणेकामी परवानगी बाबत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सुचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

पमपा/उद्यान/२१२१/प्र.क्र.८१/४४५/२०२१
दिनांक : १७/११/२०२१

**सही/-**
**सहा आयुक्त**
**तथा**
**वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**



**सिडको**
शहरांचे शिल्पकार

**जाहीर सूचना**
**(हक्कसोड पत्राबाबत)**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषांगिक कामामुळे स्थलांतरीत होणाऱ्या चिंचपाडा येथील बांधकाम क्र.MO-१६० ही बांधकामे श्री. संजय पदाजी गावंड व सुशीला भालचंद्र भगत यांचेकडून बाधित झालेली आहेत. सदर बांधकाम धारकांना भूखंड क्र. ४६, सेक्टर-R1, क्षेत्र -४०० चौ.मी. चे वाटपपत्र देण्यात आलेले आहे.

| गावाचे नाव | निवाडा क्र. /संचिका क्र. | बांधकाम क्र. | बांधकाम धारकाचे नाव | बांधकामाचे छपराखालील क्षेत्र (चौ.मी.) | वाटपित भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
| चिंचपाडा | CHMO-ICIG-२२२ | MO-१६० | श्री. संजय पदाजी गावड व सुशील भालचंद्र भगत | १३०.८९ | पुष्पक | R1 | ४६ | ४०० |

**सुशीला भालचंद्र भगत यांनी पुष्पक नोड (वडघर) येथील भूखंड क्र. ४६, सेक्टर R1 क्षेत्र - ४०० चौ.मी. या भूखंडामधील त्यांचे अविभाज्य क्षेत्रासाठी श्री. संजय पदाजी गावंड यांना हक्क देण्यात आलेले आहेत. याबाबतचे हक्कसोड तयार करण्यात येवून सह दुय्यम निबंधक पनवेल४ यांचेकडे क्र. पवल४-२८३१-२०२० दिनांक १६.०३.२०२० नोंदणीकृत करण्यात आलेले आहे.**

उपरोक्त हक्कसोडपत्राप्रमाणे सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच भूखंडाचे करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकतात.

| अ.क्र. | नाव |
|---|---|
| १. | श्री. संजय पदाजी गावंड |

वरील वाटपित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतींसह **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ) तळमजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून **तीस दिवसांच्या** आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (विमानतळ)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३१३/२०२१-२२